मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
दैनिक
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ५१५ वा ● सोमवार, ता. ९ फेब्रुवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

# दहशत करणाऱ्यांना ठोकून काढा- मुख्यमंत्री

## तौरल इंडिया प्रकल्पाचे उद्घाटन




**सुपा । रयत समाचार**

उद्योजकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्तींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस प्रशासनाला देण्यात आले असून औद्योगिक वसाहतींमध्ये गुंडगिरी खपवून घेतली जाणार नाही. उद्योजकांवर दहशत निर्माण करणाऱ्यांना ठोकून काढण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सुपा एमआयडीसी येथे 'तौरल इंडिया'च्या अत्याधुनिक उत्पादन प्रकल्पाचे उद्धाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, खासदार भागवत कराड, आमदार काशिनाथ दाते, सुरेश धस, विक्रमसिंह पाचपुते, तौरल इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक भरत गीते व थोनी अॅल्युमिनियमचे लोथर थोनी आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, तौरल इंडियाचा हा प्रकल्प महाराष्ट्राच्या औद्योगिक आत्मनिर्भरतेचे प्रतीक आहे. 'मेक इन इंडिया' संकल्पनेमुळे आयात कराव्या लागणाऱ्या वस्तूंना देशांतर्गत सक्षम पर्याय उपलब्ध होत आहेत. राज्याची औद्योगिक प्रगती विकेंद्रित करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून सुपा एमआयडीसी हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. दावोस २०२५ मधील करारांची अंमलबजावणी वेगाने होत असल्याचे त्यांनी नमूद केले. देशाची अर्थव्यवस्था ११ व्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर पोहोचली असून लवकरच तिसऱ्या क्रमांकावर पोहोचण्याचे लक्ष्य असल्याचे त्यांनी सांगितले. उद्योग पर्यावरणपूरक असणे आवश्यक असून या प्रकल्पात सस्टेनेबल कास्टिंग व रिसायकलिंगवर भर देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लोथर थोनी यांनी मनोगत व्यक्त केले, तर प्रास्ताविकात भरत गीते यांनी प्रकल्पाची माहिती दिली. कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, भगवान गडाचे महंत हभप नामदेव शास्त्री, नारायण गडाचे हभप शिवाजी महाराज यांच्यासह मान्यवर, उद्योजक व नागरिक उपस्थित होते.

> **दावोस करार प्रत्यक्षात उतरल्याने राज्यासाठी अभिमानाची बाब आहे. मराठी उद्योजकाने परदेशी भागीदारांसह उभारलेला उद्योग नवउद्योजकांसाठी प्रेरणादायी आहे. हेलिकॉप्टर, जहाजे व रस्ते बांधणीसाठी लागणारे अद्ययावत भाग आता अहिल्यानगरमध्ये तयार होत आहेत.**
>
> उदय सामंत, **उद्योगमंत्री**

> **दावोस कराराच्या माध्यमातून उत्तर महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आली असून, त्यापैकी एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात ११ हजार ५१९ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. याद्वारे सुमारे १८ हजार रोजगारनिर्मिती होणार असून उत्तर महाराष्ट्रात जवळपास ७५ हजार लोकांना रोजगार मिळेल.**
>
> **देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

# भीमाशंकर मंदिर महाशिवरात्रीला बंद राहणार

**पुणे । रयत समाचार**

श्री क्षेत्र भीमाशंकर येथे विकास आराखड्यांतर्गत सुरू असलेली बांधकामे आणि भाविकांची सुरक्षितता लक्षात घेता, यंदा महाशिवरात्रीच्या काळात (१२ ते १८ फेब्रुवारी २०२६) मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी घेतला आहे. प्रमुख कारणे: २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येथे भव्य सभामंडप आणि भाविकांच्या सोयीसाठी पायरी मार्गाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. सध्या मुख्य सभामंडप उतरवण्यात आला असून परिसरात मोठे दगड आणि यंत्रसामग्री आहे. अशा परिस्थितीत गर्दी झाल्यास अपघाताचा धोका असल्याने प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. जून ते सप्टेंबर या काळात भीमाशंकर परिसरात अतिवृष्टी होत असल्याने, उपलब्ध कोरड्या हवामानातच कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. पूर्वी महाशिवरात्रीसाठी मंदिर खुले ठेवण्याचा विचार होता, मात्र कामाची व्याप्ती पाहता आता या काळातही मंदिर बंद राहील. भाविकांनी आणि स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे.



# रेड बर्ड एव्हिएशनचे विमान कोसळले; पायलट जखमी



**कर्नाटक । रयत समाचार**

कर्नाटकातील विजयपुरा शहराजवळ रविवारी खासगी प्रशिक्षणार्थी विमानाचा अपघात होऊन ते शेतात कोसळल्याची घटना घडली. या अपघातात विमानातील दोन्ही पायलट जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रेड बर्ड एव्हिएशनच्या मालकीचे हे विमान कलबुर्गीहून बेळगावीकडे जात असताना मंगलोर गावाजवळ इंजिनमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाला. त्यानंतर नियंत्रण सुटल्याने विमान एका शेतात कोसळले. अपघातानंतर विमान काही अंतर घसरत गेल्याचे व्हिडीओमध्ये दिसत असून विमानाचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस व बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमी पायलटांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी चौकशी सुरू असल्याची माहिती तपास अधिकाऱ्यांनी दिली आहे.



# भारतात गुंतवणूकीसाठी मलेशियन कंपन्या उत्सुक

## पंतप्रधान मोदींनी साधला उद्योजकांशी संवाद

**क्वालालंपूर । रयत समाचार**


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल मलेशियातील आघाडीच्या उद्योगपतींशी संवाद साधून त्यांना विकसित भारतच्या विकासयात्रेत सहभागी होण्याचे आवाहन केले. भारताच्या आर्थिक प्रगतीबद्दल (Indian Growth Story) मलेशियन कंपन्यांमध्ये प्रचंड उत्साह असून, विशेषतः ऊर्जा, सेमीकंडक्टर आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी गुंतवणूक येण्याचे संकेत मिळत आहेत. ऊर्जा आणि तंत्रज्ञान क्षेत्रावर विशेष भर पंतप्रधानांनी मलेशियातील चार प्रमुख कंपन्यांच्या प्रमुखांशी वैयक्तिक चर्चा केली. यामध्ये पेट्रोनासचे सीईओ तेंगकू मोहम्मद तौफिक यांच्यासोबत हरित हायड्रोजन आणि हरित अमोनिया यांसारख्या स्वच्छ इंधनावर चर्चा झाली. पेट्रोनास गेल्या तीन दशकांपासून भारतात कार्यरत असून, आता अक्षय ऊर्जा क्षेत्रात आपला विस्तार करण्यास कंपनी उत्सुक आहे. तसेच, फिसन इलेक्ट्रॉनिक्सचे संस्थापक पुआ खेन सेंग यांनी भारतातील सेमीकंडक्टर उद्योगात रस दाखवला, तर बर्जया कॉर्पोरेशनने सेवा क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्याची इच्छा व्यक्त केली. शनिवारी पार पडलेल्या १० व्या भारत-मलेशिया CEO फोरमचे पंतप्रधानांनी कौतुक केले. या व्यासपीठामुळे दोन्ही देशांमधील व्यावसायिक संबंधांना नवी दिशा मिळाली असून, भविष्यात मोठ्या प्रमाणावर संयुक्त उपक्रम सुरू होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मलेशियातील उद्योगपतींनी भारताच्या आर्थिक सुधारणांचे कौतुक करत, भारतात गुंतवणूक वाढवण्यासाठी आपली उत्सुकता दर्शवली.

> **उद्योजकांशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारताने गेल्या काही वर्षांत केलेल्या धोरणात्मक सुधारणांमुळे उद्योगांसाठी एक स्थिर आणि पारदर्शक वातावरण तयार झाले आहे. पायाभूत सुविधा, एआय, डिजिटल तंत्रज्ञान आणि आरोग्य क्षेत्रात गुंतवणुकीच्या अफाट संधी आहेत.**

# संघामुळे भाजपला 'अच्छे दिन'– मोहन भागवत

**मुंबई । रयत समाचार**

भाजप सत्तेत असल्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला 'अच्छे दिन' आलेले नसून उलट संघामुळे भाजपला 'अच्छे दिन' मिळाले, असे परखड मत सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केले. भाजपसह संघप्रणित संघटनांनी कमावलेले पुण्य त्यांचेच असते; मात्र त्या संघटनांमध्ये संघातून गेलेले कार्यकर्ते असल्याने त्यांच्या पापात थोडा वाटा आमचाही येतो आणि तो आम्ही स्वीकारतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. वरळीतील नेहरू सेंटर येथे 'संघ प्रवासाची १०० वर्षे, नवे क्षितीज' या विषयावर आयोजित व्याख्यानमालेत बोलताना त्यांनी संघाचा विचार, कार्यपद्धती, भाजप-संघ संबंध, राजकारण, समाजकारण आणि आरक्षणासह विविध मुद्द्यांवर भाष्य केले. भाजपमुळे संघाला चांगले दिवस आले का, या प्रश्नावर त्यांनी संघ कोणासाठी काम करत नसून आपल्या विचार आणि ध्येयासाठी कार्य करतो, असे सांगितले. घटनात्मक आरक्षण योग्य असल्याचे सांगत दुर्लक्षित समाजाच्या पुनरुत्थानासाठी ते आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वातंत्र्यवीर सावरकरांना भारतरत्न दिल्यास त्या पुरस्काराचाच गौरव होईल, असेही त्यांनी म्हटले. समाज सजग असेल तर अनेक समस्यांवर नियंत्रण मिळवता येते, असे सांगत त्यांनी सामाजिक शिस्त आणि सजगतेचे महत्त्व अधोरेखित केले.



> **'बॅक सीट ड्रायव्हिंग' करत नाही**
>
> **भाजप, विश्व हिंदू परिषद, अभाविप, मजदूर संघ, किसान संघ या संघप्रणित संस्था स्वतंत्र असून संघ त्यांच्यावर दबाव टाकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. आम्ही 'बॅक सीट ड्रायव्हिंग' करत नाही; सरकार सरकारच चालवते, आम्ही नाही.**
>
> **मोहन भागवत**, सरसंघचालक

> **राजकारण आज मतांसाठी होत असल्याची खंत व्यक्त करत समाजाने नैतिकता जोपासल्यास राजकारण विचारांवर चालेल. जातीपातीचा विचार समाजाने सोडल्यास राजकारणातूनही तो निघून जाईल, असे मत भागवत यांनी व्यक्त केले.**

# बेल्कॉन प्रदर्शन शहर विकासाच्या विचारांचा मंच– खा. शेट्टर




**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

बेळगाव शहराला कर्नाटक राज्यात आगळीवेगळी ओळख असून क्रेडाईतर्फे आयोजित बेल्कॉन प्रदर्शन हे केवळ प्रदर्शन नसून शहर विकासाच्या विचारांचे प्रभावी व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन माजी मुख्यमंत्री तथा बेळगावचे खासदार जगदीश शेट्टर यांनी केले. सीपीएड मैदानावर आयोजित बेल्कॉन प्रदर्शनाच्या चौथ्या दिवशी शहर विकास विषयक चर्चासत्र पार पडले. त्याच्या सांगता समारंभात बोलताना खासदार शेट्टर म्हणाले की, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून विशेष निधी उपलब्ध होत आहे. बायपास, रिंग रोड, बेळगाव-कित्तूर-धारवाड नवा रेल्वे मार्ग यांसारख्या प्रकल्पांना गती मिळाली आहे. तसेच बेंगळुरू ते मुंबई हायस्पीड रेल्वे कॉरिडॉर आणि बेळगाव ते नवी मुंबई विमानसेवेबाबत केंद्रीय मंत्र्यांशी चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. कर्नाटकात सर्वाधिक पर्यटन स्थळे बेळगाव जिल्ह्यात असून त्यांच्या विकासाची कामे सुरू आहेत. सांडपाणी प्रक्रिया व कचरा व्यवस्थापनासाठी नवे प्रकल्प लवकरच सुरू होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. शहरात मराठी व कानडी भाषिक एकोप्याने राहत असून विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

# बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचे बिगुल

## विशेष मतदारयादी पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर

**पुणे । रयत समाचार**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या २०१बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने विशेष संक्षिप्त मतदारयादी पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला असून, १० मार्च २०२६ रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली जाणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे बारामती विधानसभेची जागा रिक्त झाली आहे. ही जागा भरण्यासाठी लवकरच पोटनिवडणूक होण्याची शक्यता असल्याने, निवडणूक आयोगाने मतदारयादी अद्ययावत करण्याचे काम हाती घेतले आहे. मतदारयादी अचूक आणि पारदर्शक राहावी, यासाठी मतदारांनी आपले नाव तपासावे. ज्यांची नावे यादीत नाहीत त्यांनी फॉर्म नं. ६ भरून नाव नोंदवावे, तर नावातील दुरुस्तीसाठी फॉर्म नं. ८ भरावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. १ जानेवारी २०२६ या अर्हता दिनांकावर हा कार्यक्रम आधारित असेल. या प्रक्रियेत सुसूत्रता राखण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि बारामती मतदार नोंदणी अधिकारी स्तरावर मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या बैठका घेतल्या जाणार आहेत. यामध्ये मतदान केंद्रांची यादी आणि निवडणूक कार्यक्रमाबाबत सविस्तर चर्चा केली जाईल, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### असा असेल पुनरिक्षण कार्यक्रम

**प्रारूप मतदारयादी प्रसिद्धी : सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६. दावे व हरकती स्वीकारणे : ९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२६. छाननी व निपटारा : ६ मार्च २०२६ पर्यंत. अंतिम मतदारयादी प्रसिद्धी : मंगळवार, १० मार्च २०२६.**

# गोवा पुस्तक महोत्सव : साहित्य, तंत्रज्ञान, शिक्षण व सर्जनशील उपक्रमांची रेलचेल



**पणजी । रयत समाचार**

गोव्यातील पहिल्या राष्ट्रीय पुस्तक महोत्सवाचा चौथा दिवस साहित्य, तंत्रज्ञान, शिक्षण आणि सर्जनशील उपक्रमांनी गजबजलेला राहिला. साहित्य, इतिहास, कायदा, भाषा आणि ज्ञानाच्या भविष्यासंदर्भात विचार मांडणाऱ्या सत्रांनी साहित्य रसिकांना बौद्धिक मेजवानी दिली. डी. बी. बांदोडकर मैदान येथे पुस्तक प्रदर्शनाला मोठी गर्दी होती. कुटुंबे पुस्तकांच्या स्टॉलवर वेळ घालवत होती, पर्यटक उत्सुकतेने फिरत होते. शालेय विद्यार्थी आनंदाने पुस्तके पाहत होते, तर महाविद्यालयीन विद्यार्थी विविध सत्रांमध्ये सक्रिय सहभाग घेत होते. ऑथर्स कॉर्नरमध्ये झालेल्या Stories of the Soul: Life, Death, and What Endures या सत्रात लेखिका मेधा खासगीवाले यांनी संजय चक्राणे यांच्याशी संवाद साधला. त्यांनी मृत्यूची भीती, शरीराशी जोडलेली ओळख तसेच चेतना आणि सूक्ष्म शरीर यांसारख्या संकल्पनांवर प्रकाश टाकला. मृत्यू म्हणजे अस्तित्वाचा अंत नसून चेतनेची शरीरातून माघार असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर Moving Towards Digital Library या सत्रात गोवा सेंट्रल लायब्ररीचे क्युरेटर डॉ. सुशांत तांडेल यांनी डिजिटल लायब्ररीचे महत्त्व स्पष्ट केले. इंटरनेटवरील माहितीची सत्यता तपासण्याची गरज अधोरेखित करत ग्रंथपालांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. डिजिटल लायब्ररीमुळे २४ तास माहिती उपलब्ध होते, असेही त्यांनी नमूद केले. Translation & Accessibility: Making Literature Inclusive या सत्रात अनुवाद, तंत्रज्ञान आणि एआयच्या माध्यमातून साहित्य अधिक लोकांपर्यंत कसे पोहोचू शकते यावर चर्चा झाली. गोपीनाथ विष्णू गावस यांनी एआय उपयुक्त ठरू शकते, मात्र मूळ साहित्याचा आत्मा जपणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. राष्ट्रीय पुस्तक न्यास (NBT) तर्फे प्रकाशक बैठक आयोजित करण्यात आली. सुमारे ३५ ते ४० प्रकाशकांनी सहभाग घेत ISBN प्रकाशनांची दृश्यता, प्रशिक्षण आणि प्रकाशकांना मदत यावर चर्चा केली. After Me, Chaos: Astrology in the Mughal Empire या सत्रात पत्रकार एम. जे. अकबर यांनी मुघल काळातील ज्योतिषशास्त्राची भूमिका स्पष्ट केली. वकील सुमंत बत्रा यांनी The Life and Legacy of Arun Jaitley या पुस्तकावर चर्चा करताना अरुण जेटली यांच्या जीवनप्रवासाबद्दल माहिती दिली. बालकोपऱ्यात २५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला. Let's Design a Mascot", "Tell a Tale आणि व्यंगचित्र कार्यशाळा या उपक्रमांनी मुलांचा उत्साह वाढवला. दिवसाचा शेवट 'शिवप्रताप' या भव्य संगीत-नाट्य सादरीकरणाने झाला, ज्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन, संघर्ष आणि स्वराज्याची स्थापना प्रभावीपणे सादर करण्यात आली.

# बौद्ध महासभेकडून माता रमाई यांना अभिवादन



**अहमदनगर । रयत समाचार**

भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगर शहर शाखेतर्फे माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त सिद्धार्थनगर येथील सिद्धार्थ बुद्ध विहारात अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि माता रमाई यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. तसेच मेणबत्ती व अगरबत्ती प्रज्वलित करून त्रिसरण पंचशील, बुद्धपूजा, भीमस्मरण व भीमस्तुती घेण्यात आली. महिला उपाध्यक्षा हर्षा पंचमुख यांनी माता रमाई यांच्या जीवनकार्यावर भाष्य करताना बाबासाहेब आंबेडकरांना त्यांनी दिलेल्या मोलाच्या साथीसंदर्भात मार्गदर्शन केले. शहराध्यक्ष दिपक पाटोळे यांनी मनोगत व्यक्त करताना, बाबासाहेबांचा इतिहास लिहिताना रमाईंचे योगदान अनिवार्य असल्याचे सांगत त्यांच्या त्याग व भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, संस्कार उपाध्यक्ष भगवंत गायकवाड, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, महिला जिल्हाध्यक्षा सुनिता गायकवाड, भिंगारदिवे, ॲड विद्या शिंदे, ज्योती गायकवाड, माया गायकवाड आदींनी रमाई जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, कोषाध्यक्ष विजय चाबुकस्वार, जिल्हा शाखेचे राहुल कांबळे, रविंद्र कांबळे, गौतम पाचारणे तसेच शहर शाखेचे मोहन शिरसाट, मिलिंद घाटेशाही, युवराज बनसोड, राजेंद्र पाडळे, विजय पाटोळे, शशिकांत घोडके, विजय शिंदे उपस्थित होते.



# आत्मविश्वास हीच खरी सुरक्षितता-अग्रवाल

## मूकबधिर विद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांना स्व-संरक्षणाचे धडे

**अहमदनगर । समीर मन्यार**

**प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना आजूबाजूच्या वातावरणाबाबत सतर्क राहणे, ऐकण्याऐवजी दृष्टी, स्पर्श, शरीर हालचाल व व्हायब्रेशन या सेन्सेसचा प्रभावी वापर, संशयास्पद हालचाली व चुकीचा स्पर्श ओळखणे, धोका टाळण्यासाठी योग्य निर्णय घेणे तसेच साइन लँग्वेज, हातवारे, मोबाईल व लिखित संदेशांद्वारे मदत मागण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले.**

दिव्यांग मुलांसाठी सेल्फ-डिफेन्स म्हणजे केवळ शारीरिक तंत्र नव्हे, तर आत्मविश्वास, स्वतःची सुरक्षितता आणि परिस्थितीची अचूक ओळख निर्माण करणारे प्रभावी शस्त्र आहे, असे प्रतिपादन ज़ेवाना कंपनीच्या संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी सुश्री दीक्षा अग्रवाल/भावले यांनी केले.

कमिन्स इंडिया फाउंडेशनच्या वतीने प्रो ॲक्शन सेल्फ डिफेन्स अकॅडमी, पुणे यांच्या सहकार्याने सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटीच्या मूकबधिर विद्यालयातील दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी आठ दिवसीय सेल्फ-डिफेन्स प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्भयता, सजगता व स्वसंरक्षणाची जाणीव निर्माण झाली.

यावेळी विद्यालयाचे चेअरमन मधुकर भावले, ज्येष्ठ संचालिका विद्या भावले, राहुल भावले, मुख्याध्यापक डी. के. जगधने, अकॅडमीच्या संस्थापक वर्षा पडवळ, निलेश रेणुसे, मुख्य प्रशिक्षक सायली भणगे, सिद्धा रेणुसे, युवराज लंकेश्वर यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. परिस्थिती जागरूकता विकसित करून स्वतःचे संरक्षण कसे करावे याचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले असल्याचे ज्येष्ठ संचालिका विद्या भावले यांनी सांगितले. या उपक्रमामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांना दैनंदिन जीवनात सुरक्षिततेची नवी ताकद मिळाल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले.

# जिजामाता महाविद्यालयात कथा, काव्यलेखन कार्यशाळेचे आयोजन



**अहमदनगर । रयत समाचार**

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने या वर्षातील पहिली कथा-कविता लेखन कार्यशाळा नेवासा तालुक्यातील भेंडा कारखाना येथील जिजामाता महाविद्यालयात आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांनी दिली.

कार्यशाळेच्या नियोजनाबाबतची बैठक कोहिनूर मंगल कार्यालय येथे कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी सुनील गोसावी, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, प्रा. डॉ. अनिल गर्जे, मकरंद घोडके, शर्मिला गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते. एप्रिल महिन्यात होणाऱ्या सतराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या निमित्ताने ता. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता कथा-कविता लेखन कार्यशाळा व काव्य संमेलन आयोजित करण्यात येत आहे.

कार्यशाळेच्या नियोजनासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या असून ग्रामीण भागातील युवक-युवती तसेच नवोदित लेखक व कवींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. परिसरातील विविध शाळा व महाविद्यालयांतील प्राध्यापक व विद्यार्थ्यांना निमंत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला. शब्दगंधच्या नेवासा तालुका शाखेच्या वतीने पदाधिकाऱ्यांनी शाळा-महाविद्यालयांना भेट देऊन आवाहन करण्याचे ठरवण्यात आले. यावेळी शब्दगंध साहित्यिक परिषदेची नेवासा तालुका शाखा कार्यकारिणीही जाहीर करण्यात येणार आहे. या बैठकीत सोशल मीडिया समन्वयक म्हणून मकरंद घोडके यांची निवड करण्यात आली. तसेच २२ फेब्रुवारी रोजी ''वाटा संघर्षाच्या राजेंद्र उदागे गौरव ग्रंथ'' या पुस्तकाचे प्रकाशन करण्याचे निश्चित करण्यात आले. शेवगाव, पाथर्डी व नेवासा परिसरातील इच्छुकांनी प्रा. डॉ. किशोर धनवटे (मोबा. क्र. ९८५०८६३५०९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रा. डॉ. अशोक कानडे, डॉ. अशोक ढगे, भाऊसाहेब सावंत, दिगंबर गोंधळी, डॉ. राजेंद्र गवळी, प्रा. डॉ. दिगंबर सोनवणे, देविदास अंगारक, पांडुरंग रोडगे, सुनील पंडित, काकासाहेब भाबड यांनी केले.



सौंदाळा ग्रामपंचायतचा जातमुक्त गाव ठराव; भाकपकडून स्वागत

# सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा निर्णय- कॉ. ॲड. सुभाष लांडे

**अहमदनगर । रयत समाचार**

**सौंदाळा (ता. नेवासा) ग्रामपंचायतीने जातमुक्त गावाचा ठराव संमत केल्याबद्दल सरपंच शरद आरगडे व ग्रामसभेचे अभिनंदन करणारा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. हा निर्णय सामाजिक न्याय व समतेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक बुरुडगाव रोड येथील पक्ष कार्यालयात कॉम्रेड प्रताप सहाने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत सामाजिक समता, कामगार-शेतकरी प्रश्न, आगामी आंदोलन तसेच निवडणूक तयारीवर चर्चा करण्यात आली.

यावेळी पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. ॲड. सुभाष लांडे, जिल्हा सहसचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. संतोष खोडदे, बापूराव राशिनकर, सुरेश पानसरे, दशरथ हासे, दत्तात्रेय आरे, ज्ञानोबा गायकवाड, सुनील दुधाडे, सुलाबाई आदमाने, सुनिता सहाणे, राजेंद्र व्यवहारे आदी उपस्थित होते. बैठकीत १२ फेब्रुवारी रोजी कामगार संघटना संयुक्त कृती समिती व संयुक्त किसान मोर्चा यांच्या देशव्यापी संपाला सीपीआयने पाठिंबा जाहीर केला. सर्व जनसंघटना या आंदोलनात सहभागी होणार असल्याचा ठराव मंजूर करण्यात आला. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गट व गण निश्चित करून निवडणूक तयारी सुरू करण्याचे आवाहन करण्यात आले. २५ फेब्रुवारीपर्यंत सभासद नोंदणी मोहीम पूर्ण करण्याचा निर्णयही घेण्यात आला. कॉ. ॲड. सुभाष लांडे म्हणाले की, सौंदाळा ग्रामपंचायतीचा जातमुक्त गाव ठराव सामाजिक परिवर्तनाचा ऐतिहासिक टप्पा आहे. महागाई, बेरोजगारी व खासगीकरणाविरोधात १२ फेब्रुवारीचा संप महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. कॉ. ॲड. सुधीर टोकेकर यांनी आयटक संलग्न संघटना संपात सहभागी होणार असल्याचे स्पष्ट केले. प्रास्ताविक कॉ. संतोष खोडदे यांनी केले.

# गुरुवारी मुस्लिम वधु-वर मेळाव्याचे आयोजन

**अहमदनगर । आबीद खान**

नगर शहरात विवाह इच्छुकांसाठी एक उत्तम संधी उपलब्ध होत असून गुरुवार, ता. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १२ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत एकदिवसीय भव्य मुस्लिम वधुवर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती रहेमत सुलतान मॅरेज ब्युरोचे आरिफ सय्यद यांनी दिली.

हा मेळावा सर्व मुस्लिम समाजातील नागरिकांसाठी खुला व मोफत असून विवाहासाठी योग्य स्थळ शोधणाऱ्या कुटुंबांना एकाच ठिकाणी अनेक पर्याय उपलब्ध होणार आहेत. या मेळाव्यात संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या विवाहयोग्य मुला-मुलींचे फोटो व बायोडाटा पाहण्याची सुविधा उपलब्ध असणार आहे.

डॉक्टर, इंजिनियर, सुशिक्षित तसेच कमी शिक्षित, अविवाहित, घटस्फोटित, विधवा-विधुर अशा सर्व प्रकारच्या स्थळांची माहिती येथे मोफत पाहायला मिळणार असल्याचे युनूस तांबटकर यांनी सांगितले.वधू-वर परिचय मेळाव्यासाठी येणाऱ्या पालकांनी आपल्या मुला-मुलींचे फोटो व बायोडाटा सोबत आणणे आवश्यक आहे. इच्छुकांना आपल्या पसंतीनुसार योग्य स्थल शोधण्याची संधी मिळणार असून त्यामुळे विवाह जुळविण्याची प्रक्रिया सुलभ होणार असल्याचे शफकत सय्यद यांनी सांगितले.

मेळाव्यासाठी प्रवेश पूर्णतः मोफत असून फोटो व बायोडाटा असलेल्या व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार आहे. मेळाव्यानंतर पुढील संपर्कासाठी नोंदणी करणे आवश्यक राहणार आहे. विवाह इच्छुक कुटुंबांनी या संधीचा लाभ घ्यावा, अधिक माहितीसाठी ७५१७८ ६०७८६ व ९८५०६ ८७८६८ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आबीद दुलेखान यांनी केले.

# पाउलबुधे महाविद्यालयात संशोधन व प्रबंध लेखनावर मार्गदर्शन



**अहमदनगर । विजय मते**

वसंत टेकडी परिसरातील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन. जे. पाउलबुधे कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये एम. फार्मसी विद्यार्थ्यांसाठी संशोधन व प्रबंध लेखनावर मार्गदर्शन करण्यात आले.

'रिसर्च थिसिस रायटिंग' आणि 'जर्नल पब्लिकेशन' या विषयांवर आधारित अकॅडेमिक ओरिएंटेशन अँड रिसर्च स्किल इनहॅन्समेंट कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या एकदिवसीय शैक्षणिक कार्यक्रमाचा उद्देश पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा संशोधनातील पाया मजबूत करणे, संशोधनाभिमुख दृष्टिकोन विकसित करणे तसेच गुणवत्तापूर्ण प्रबंध लेखन व जर्नल प्रकाशनासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यास मार्गदर्शन करणे हा होता.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष विनय पाउलबुधे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच संस्थेचे सचिव रामकिसन देशमुख, संचालक साई पाउलबुधे आणि प्रशासक डॉ. श्रद्धा पाउलबुधे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी डॉ. विखे पाटील फाउंडेशन कॉलेज ऑफ फार्मसीचे उपप्राचार्य डॉ. रमेश सावंत हे प्रमुख संसाधन व्यक्ती म्हणून उपस्थित होते. त्यांनी संशोधनाची मूलतत्त्वे, प्रबंध लेखनातील बारकावे व आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशनासाठी आवश्यक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दिले. कार्यक्रमाचे संयोजक प्राचार्य डॉ. श्याम पांगा, सह-संयोजक डी. फार्म विभागाच्या प्राचार्या अनुराधा चव्हाण, कार्यक्रम सचिव डॉ. रोशनी सूर्यवंशी, फार्मास्युटिकल केमिस्ट्री विभाग प्रमुख डॉ. प्रसाद घुगरकर आणि ग्रंथपाल स्वाती कडनोर यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमामुळे एम. फार्मसी विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाबाबत आत्मविश्वास निर्माण होऊन गुणवत्तापूर्ण संशोधन व प्रकाशनासाठी प्रेरणा मिळाल्याचे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

रयत समाचार Classified
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० । ७७७४००१८०० । ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# मढेवडगाव येथे कृषी मेळावा उत्साहात


## शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्री दत्तकृपा शैक्षणिक कृषी ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित साईकृपा कृषी महाविद्यालय, घारगाव येथील कृषीकन्या व कृषीदूत यांच्या संयुक्त विद्यमाने मढेवडगाव येथे कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यास शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. के. एच. निंबाळकर होते. उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे व सचिव अर्चना पानसरे यांच्या हस्ते करण्यात आले.



ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत कृषीकन्या अनिशा रुपनवर, स्नेहल आचार्य, पुनम गायकवाड, प्रणाली मादनकर, प्रणोती महारनवर तसेच कृषीदूत कुणाल काळभोर, यशराज काळाणे, प्रतीक जठार, मनमोहन देवीकर, वैभव कोकरे व अभिजीत क्षीरसागर यांनी मेळाव्याचे आयोजन केले. मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. के. एच. निंबाळकर यांनी पिकांचे बाजारभाव, आधुनिक शेती तंत्रज्ञान, मशागत तसेच कीड-रोग नियंत्रण याबाबत सविस्तर माहिती दिली. गाव पातळीवर शेतकरी समिती स्थापन करून नियोजनबद्ध पिक पद्धती राबविल्यास उत्पादन वाढीस मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांनी अंदाजावर किंवा इतरांच्या अनुभवावर अवलंबून न राहता कृषी विभागातील तज्ज्ञ, कृषीकन्या, कृषीदूत व कृषी सहाय्यक अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊनच खते व कीटकनाशकांचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. मेळाव्याचे प्रमुख आकर्षण म्हणून सिजेंटा, बायस्टेट, बी.ए.एस.एफ., बायर, कोरोमंडल आदी नामांकित कृषी औषध कंपन्यांचे माहितीपर स्टॉल लावण्यात आले होते. या कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी, मंडळ कृषी अधिकारी शितल आरु, कृषी सहाय्यक अधिकारी किरण घोडके, संचालक सुभाष शिंदे, सरपंच प्रमोद शिंदे, उक्कडगावचे सरपंच प्रसाद महाडिक, चेअरमन सुमन मांडे, पंडित कातोरे, बाळासाहेब मांडे, उपसरपंच राजकुमार उंडे, राहुल साळवे, व्हा. चेअरमन शरद शिंदे, सचिन कातोरे, संदीप औटी, जैविक शेती मित्र संतोष पानसरे, फुलसिंग मांडे यांच्यासह कार्यक्रम समन्वयक प्रा. शैलजा औटी, प्रा. नागेश जाधव, प्रा. सुप्रिया बंडगर आदी मान्यवर उपस्थित होते.



# ज्येष्ठ महिलांचा सन्मान, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

## पुण्यस्मरणानिमित्त बनकर कुटुंबीयांचा शिक्षणाला प्रोत्साहन देणारा उपक्रम

**नगर तालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील मथुराबाई भाऊसाहेब बनकर यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त बनकर कुटुंबीयांनी गावात एक वेगळा आणि समाजोपयोगी उपक्रम राबवला. यानिमित्ताने गावातील ज्येष्ठ महिलांचा सन्मान करण्यात आला तसेच जुन्या काळातील सातवी पास ज्येष्ठ महिला सुलोचना सावळेराम झिने यांना 'आमची सावित्री' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या पुरस्कारात सन्मानचिन्ह, साडी व चोळी अशी भेट देण्यात आली. सुलोचना झिने यांनी जुन्या काळात सातवी उत्तीर्ण होऊन नोकरी न करता शेती व घरगुती व्यवसायातून कुटुंबाचा प्रपंच सक्षमपणे सांभाळला. त्यांच्या कष्टकरी व समर्पित जीवनाला मानवंदना देण्याचा हा प्रयत्न बनकर कुटुंबीयांनी केला. कार्यक्रमात उपस्थित पाहुण्यांनी शालेय साहित्य, वह्या, पुस्तके आदी स्वरूपात भेटवस्तू जमा केल्या. संकलित साहित्य गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. हा उपक्रम शिक्षणाला प्रोत्साहन देणारा व समाजातील गरजूंना मदत करणारा ठरला. यावेळी प्रा. देवराम शिंदे व प्राचार्य ज्ञानदेव खराडे यांनी बनकर कुटुंबीयांच्या उपक्रमाचे स्वागत करताना हा समाजासाठी आदर्श असल्याचे सांगितले. ज्येष्ठांचा सन्मान आणि गरजू विद्यार्थ्यांना मदत यांचा सुंदर संगम यात दिसतो, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिदास पुंड यांनी केले तर आभार संतोष बनकर यांनी मानले.

# आदिवासी विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण

## आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्याची मागणी

**कोपरगाव । किसन पवार**

आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या इंग्रजी माध्यम शाळा, कोकमठाण येथे विद्यार्थ्यांना खोलीत डांबून अमानुष मारहाण करण्यात आल्याचा आरोप असून या घटनेमुळे अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद आक्रमक झाली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण केल्याप्रकरणी आदिवासी समाजात रोष निर्माण झाला असून आदिवासी विकास विभागावर धडक देण्याची तयारी सुरू असल्याचे निवेदनाद्वारे सांगण्यात आले. हे निवेदन दिनकर पावरा, अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांना देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, आत्मा मलिक इंग्रजी माध्यम शाळा, कोकमठाण येथील विद्यार्थी ओम युवराज निकुळे, विक्रम रोहिदास राऊत, कुंदन जनार्धन आवारी आणि दिलीप रविदास राऊत या विद्यार्थ्यांना अमानुष मारहाण करण्यात आली. या घटनेमुळे संबंधित विद्यार्थी शाळेतून पळून गेल्याचे सांगण्यात आले असून इतर विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या शरीरावर जखमा झाल्याचा आरोपही करण्यात आला. या प्रकरणी तात्काळ कारवाई न झाल्यास पालकांसह आदिवासी विकास विभाग, नाशिक येथे भव्य मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे युवा प्रदेशाध्यक्ष गणेश गवळी यांच्यासह जनार्दन आवारी, रोहिदास राऊत, युवराज निकुळे, गंगाधर गवळी आदींच्या सह्या आहेत.

**करण्यात आलेल्या मागण्या**

**सदर शाळेची मान्यता व अनुदान रद्द करावे, मारहाण करणाऱ्या शिक्षक प्रशासनाविरोधात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करावा, तसेच आदिवासी विद्यार्थ्यांकडून विविध कार्यक्रम व परीक्षा शुल्क घेतल्याच्या प्रकरणाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करावी आणि अनुदान रोखून ते पैसे विद्यार्थ्यांना डीबीटी स्वरूपात द्यावेत, अशी मागणी करण्यात आली. एकात्मिक प्रकल्प कार्यालय, सहाय्यक प्रकल्प अधिकारी राजूर यांची चौकशी समिती अमान्य असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले.**

# आज संभाजी ब्रिगेडचे दशक्रिया आंदोलन

## रस्ते कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

एम.एस.आय.डी.सी. (MSIDC) या शासकीय एजन्सीमार्फत सुरू असलेल्या रस्ते कामाच्या दर्जाबाबत गंभीर तक्रारी असून प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोमवार ता. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजता तहसील कार्यालय, श्रीगोंदा येथील रस्त्यावर बसून प्रतीकात्मक दशक्रिया आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

शहरातील रस्ते काम निकृष्ट दर्जाचे सुरू असून नियोजनाअभावी नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत वारंवार निवेदन देऊनही ठोस कारवाई न झाल्याने आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे संभाजी ब्रिगेडने स्पष्ट केले आहे. ता. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी श्रीगोंदेकरांचे ग्रामदैवत शेख महंमद बाबा यांची यात्रा असून महाराष्ट्रभरातून लाखो भाविक श्रीगोंद्यात दाखल होतात. त्यामुळे रस्त्यांची दुरवस्था राहिल्यास भाविकांची गैरसोय होण्याची शक्यता असल्याने यात्रा होण्यापूर्वी रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासन व संबंधित ठेकेदारांकडून ठोस व लेखी आश्वासन मिळेपर्यंत प्रतीकात्मक दशक्रिया आंदोलन सुरू ठेवण्यात येईल, असा इशारा देण्यात आला असून आंदोलन शांततेच्या मार्गाने करण्यात येणार असल्याचे संभाजी ब्रिगेडने नमूद केले आहे.

**आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या**

**एम.एस.आय.डी.सी. मार्फत सुरू असलेले रस्ते काम उच्च दर्जाचे व नियमांनुसार करण्यात यावे, शहरातील रस्त्यांच्या कडेला साईड गटारांची व्यवस्था करावी, नागरिकांना सुरक्षितपणे पायी चालता यावे यासाठी फुटपाथची व्यवस्था करावी, रस्त्यामधील चेंबरची दुरुस्ती करून सांडपाण्याची योग्य सोय करावी तसेच गॅस पाईपलाईन व पाण्याची पाईपलाईन नियोजनबद्ध पद्धतीने टाकून भविष्यात पुन्हा रस्ता खोदण्याची वेळ येऊ नये याची दक्षता घ्यावी, तसेच ठेकेदाराने मंजूर इस्टिमेटप्रमाणे दर्जेदार काम ठरलेल्या वेळेत पूर्ण करावे.**



# अध्यात्म आणि सकारात्मक विचारांनीच समाज घडतो- डॉ. वंदना मुरकुटे

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

समाजात चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही प्रवृत्ती असल्या तरी चांगल्या प्रवृत्तींचा प्रभाव समाजमनावर खोलवर रुजत असतो. सकारात्मक कार्याला अध्यात्माची जोड मिळाल्यास त्यातून ईश्वरी संदेशही समाजापर्यंत पोहोचतो, असे मत ज्येष्ठ विचारवंत तथा श्रीरामपूर तालुका पंचायत समितीच्या माजी सभापती डॉ. वंदना मुरकुटे यांनी व्यक्त केले.



पाथर्डी येथील गोरे मंगल कार्यालयात राजीव गांधी फाउंडेशनच्या वतीने शिष्यवृत्ती वितरण व विद्यार्थ्यांशी संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, माजी नगरसेवक बंडू बोरुडे, ज्येष्ठ विचारवंत प्रा. श्रीकांत काळोखे, प्रा. सुरेखा चेमटे, डॉ. योगीराज देशमुख, धनंजय डहाळे, अनिल ढाकणे, संत नरहरी महाराज सुवर्णकार मंडळाचे सचिव योगेश घोडके यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीचे धनादेश देण्यात आले.

डॉ. मुरकुटे पुढे म्हणाल्या की, पाथर्डी तालुक्याची पूर्वी शेतमजूर व ऊसतोड कामगारांचा तालुका अशी ओळख होती; मात्र गेल्या काही वर्षांत येथे शैक्षणिक प्रगती झाली असून विद्यार्थी विविध क्षेत्रांत चमकू लागले आहेत.

प्रशासकीय सेवा, पोलीस दल तसेच शिक्षण क्षेत्रात तालुक्यातील युवक कार्यरत आहेत. आत्मविश्वास, परिश्रम आणि समाजाच्या पाठबळावर तालुक्याने स्वतःची नवी ओळख निर्माण केली आहे. तरुणांना लहानपणापासून अध्यात्म, योग व नैतिक मूल्यांची गोडी लागल्यास नकारात्मक प्रवृत्तींपासून ते दूर राहतील. सध्याच्या ताणतणावाच्या वातावरणात सकारात्मक विचार आणि सामूहिक प्रयत्न समाजाला अधःपतनापासून वाचवू शकतात. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळते, असेही त्यांनी नमूद केले. मुख्य आयोजक सलीमभाई शेख यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. हाजी हुमायूनभाई आतार यांनी सूत्रसंचालन केले तर जिल्हाध्यक्ष अरविंद सोनटक्के यांनी आभार प्रदर्शन केले.

# बिबट दर्शनाने नागरिकांत दहशत

## वन विभागाकडे बंदोबस्ताची मागणी

**नेवासा । विजय खंडागळे**



सोनई-लांडेवाडी, शनिशिंगणापूर रस्त्यावरील लिपाने वस्ती व घावटे वस्ती परिसरात गेल्या आठ दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्री उशिरापर्यंत जागरण करावे लागत असून नागरिकांनी धसका घेतला आहे. लिपाने वस्तीवरील रमेश लिपाने व उद्योजक जुगल बंग यांना बिबट्याचे दर्शन झाल्याचे सांगण्यात आले आहे. लिपाने यांच्या दोन कुत्र्यांपैकी एका कुत्र्याचा बिबट्याने फडशा पाडल्याची घटना घडली असून एका शेळीला जखमी केल्याचेही सांगण्यात आले. परिसरात वारंवार बिबट्या दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीती वाढली आहे. बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांना शेतीची कामे करण्यासही भीती वाटत असून रात्री आठ नंतर घराबाहेर पडण्यास लोक घाबरत आहेत. संबंधित वन विभागाने तातडीने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.

**दोन दिवसांपूर्वी पहाटे फिरायला गेले असता जुगल बंग व रमेश लिपाने यांच्या समोर बिबट्या आडवा गेल्याने त्यांनी जीव मुठीत धरून घरी परतल्याचे सांगितले. त्यामुळे परिसरातील मार्गांवर अखंडित वीजपुरवठा ठेवावा तसेच वन विभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी जुगल बंग, किशोर बंग व रमेश लिपाने यांनी केली.**

# निमगाव शाळेचा बाल आनंद बाजार उत्साहात; २५ हजार रुपयांची उलाढाल

**श्रीरामपूर । रयत समाचार**

तालुक्यातील निमगाव खैरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त 'आनंददायी शनिवार' अंतर्गत बाल आनंद बाजार मेळावा उत्साहात पार पडला.



बाल आनंद बाजाराचे उद्घाटन केंद्रप्रमुख बाबासाहेब पिलगर यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविकात मुख्याध्यापक संतोष वाघमोडे यांनी उपक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. अध्यक्ष विलास शेजुळ यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञान मिळते, असे सांगितले. प्रमुख पाहुणे सरपंच दत्तात्रय झुराळे, उपसरपंच विजयसिंग परदेशी, नितीन भागडे, सुरेश कालंगडे, भागचंद उंदरे, अमोल कालंगडे, वेणूनाथ कालंगडे, बाळासाहेब दुशिंग, रावसाहेब शेजुळ, कृष्णा पठारे, गोस्वामी बाबा, गणेश तरस, सोनाली साबळे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ व भाजीपाल्यांचे स्टॉल लावून सक्रिय सहभाग घेतला. म्हैसूर भोंडा, दाबेली, इडली, पोहे, पाणीपुरी, सरबत, साबुदाणा वडा, समोसा, पापड, भेळ, मॅगी, ढोकळा, सोयाबीन चिली तसेच मिरची, मेथी, पालक, कांदे, वांगी, शेवग्याच्या शेंगा, गवतीचहा, शेपू, लिंबू, मुळा, हरभरा, वाल शेंगा आदी भाजीपाल्यांची विक्री करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक संतोष वाघमोडे, शिक्षिका प्रतिभा तोरणे, मीना निकम, सुधा गमे यांनी परिश्रम घेतले. उत्कृष्ट बचतगट सीआरपी पुरस्कार मिळाल्याबद्दल संगिता काळे यांचा सन्मान करण्यात आला.

**चिमूकल्यांच्याच्या बाजारात हजारोंची उलाढाल**

**विद्यार्थ्यांनी आनंद बाजारात सुमारे २५ हजार रुपयांची उलाढाल केली. आवेज अफसर शेख यांच्या मिरची स्टॉलने १८०० रुपये तर पियूष योगेश जाधव यांच्या औषधी सरबत स्टॉलने १२०० रुपयांची कमाई केली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना खरेदी-विक्री, नफा-तोटा व ग्राहकांशी संवाद यांचे व्यवहारिक ज्ञान मिळाले.**

बाजारात ग्रामस्थ व पालकांची मोठी उपस्थिती होती. गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे व शिक्षण विस्ताराधिकारी दीपक त्रिभुवन यांनी शाळेचे अभिनंदन केले.

